# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार
क्र.रामाआ/तक्रार/५४५/२०२४/जळगाव

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री.शेख इमरान शेख शाहाबुद्दीन,<br>रा.प्लॉट नं.१६, सर्वे नं.१६, अकसा नगर, मेहरुन, जळगाव, ता.जि.जळगाव-४२५००१ | मुख्याध्यापक, के.एस.टी.उर्दु हायस्कूल, नशिराबाद, ता.जि.जळगाव-४२५३०९. |

सुनावणी दिनांक-१५/०९/२०२५

तक्रारदार यांनी दि.११/०९/२०२४ रोजीच्या अर्जान्वये, "आयोगाने द्वितीय अपिल क्र.१३०६/२०२०/जळगाव संदर्भात आपण माझ्या अर्जाप्रमाणे दिनांक ०६/०३/२०२४ चे आदेश पारीत करुन मला १५ दिवसात हवी असलेली माहिती मिळवून द्यावी असे आदेशीत करुन ही मला आजपावेतो हवी असलेली माहिती देण्यात आलेली नाही. संबंधित सर्व आपले आदेशाचे सर्रास अवमान करीत असल्याने आपणास विनंती करतो की आपण संबंधितांवर दंडात्मक व शिस्तभंगाची कार्यवाही प्रचलीत शासन नियमान्वये कार्यवाही करुन मला हवी असलेली माहिती मा.उच्च न्यायालयीन कामा साठी मिळवून द्यावी." असे नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियमांतील कलम १८(१) अंतर्गत आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.१५/०९/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी- तक्रारदार उपस्थित असून, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.२०/०१/२०२० रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"डिसेंबर, २०१७ ते जानेवारी, २०२० या कालावधीतील के.एस.टि.उर्दु हायस्कुल नशिराबाद शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर अनुदानित व विना अनुदानित कर्मचाऱ्यांचे हजेरी मस्टरची छायाप्रती."

४. आयोगाने, द्वितीय अपिल क्र.१३०६/२०२०/जळगाव संदर्भात आयोगासमोर दिनांक ०४/०७/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक ०६/०३/२०२४ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत.

"विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, के.एस.टि.उर्दु हायस्कूल, नशिराबाद, जळगाव यांनी अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत मागणी केलेली माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी व जी माहिती उपलब्ध होऊ शकत नाही, त्याबाबतचे स्पष्ट कारण नमूद करुन अपिलार्थीस लेखी कळवावे."

५. सुनावणी दरम्यान उपस्थित तक्रारदार यांनी असे कथन केले की, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, के.एस.टि.उर्दु हायस्कूल, नशिराबाद, जळगाव यांनी आयोगाने द्वितीय अपिल क्र.१३०६/२०२०/जळगाव संदर्भात पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी केली नाही व माहिती मिळाली नाही.

६. सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, आयोगाने द्वितीय अपिल क्र.१३०६/२०२०/जळगाव संदर्भात दिनांक ०६/०३/२०२४ अन्वये पारीत केलेल्या आदेशाची तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, के.एस.टि.उर्दु हायस्कूल, नशिराबाद, जळगाव, ता.जि.जळगाव यांनी अंमलबजावणी केल्याचे दिसून येत नाही. तक्रारदार यांना आयोगाच्या आदेशानुसार मागितलेली माहिती अद्यापही अप्राप्त असल्याचे दिसनू येते. प्रत्यक्ष सुनावणीवेळी तत्कालीन आणि विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित असून सुनावणीपूर्वी त्यांनी कोणताही अहवाल प्रस्तूत प्रकरणी आयोगास सादर केलेला नसल्याने प्रस्तूत प्रकरणाची वस्तुस्थिती आयोगाच्या निदर्शनास आलेली नाही.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, के.एस.टि.उर्दु हायस्कूल, नशिराबाद, जळगाव, ता.जि.जळगाव यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने द्वितीय अपिल क्र.१३०६/२०२०/जळगाव संदर्भात दिनांक ०६/०३/२०२४ अन्वये पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) द्वितीय अपिल सुनावणीवेळी कार्यरत (दि.०४/०७/२०२३ रोजी कार्यरत) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, के.एस.टि.उर्दु हायस्कूल, नशिराबाद, जळगाव, ता.जि.जळगाव यांनी आयोगाच्या आदेशानुसार कोणतीही कार्यवाही केली नाही म्हणून यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील याची नोंद घ्यावी.

३) वरील निर्देशांसह प्रस्तूत तक्रार क्र.५४५/२०२४/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र. ११५२ दिनांक:- 16 FEB 2026